**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २३.०४.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची अवैध दारुविक्री करणारे व सार्वजनिक ठिकाणी दारु पिणारे इसमांविरुध्द धडक मोहीम :—**

मा. श्री. नविनचंद्र रेड्डी प्रभारी पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आदेशान्वये मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मा. श्री. राजेन्द्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग), मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग) यांचे मार्गदर्शनात नागपुर शहर पोलीसांनी, संपुर्ण नागपुर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने तसेच, गुन्हेगारावर वचक बसावा याकरीता सार्वजनिक ठिकाणी अवैधरित्या दारु प्राशन करणारे, दारुविक्री करणारे, दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन देणारे इसमांविरुध्द तसेच आस्थापनांविरुध्द दिनांक २०.०४.२०२६ रोजी पासून विशेष मोहीम राबविली. मोहीमेदरम्यान नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र दारूबंदी व एनडिपीएस कायद्यान्वये एकुण ९४ गुन्हे दाखल करून ९८ आरोपींवर कारवाई करण्यात येऊन एकूण ५६,८५,५१५/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. मोहीमेदरम्यान नागपूर शहरातील पाहिजे आरोपी, फरार आरोपी तसेच सराईत, घरफोडी करणारे, वाहन चोरी करणारे, एम.पी.डी.ए रिलीज व शरीराविरूध्द गुन्हे करणारे सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची त्यांचे राहते ठिकाणी जावुन तपासणी करण्यात आली. मिळुन आलेल्या गुन्हेगारांचा अभिलेख अद्ययावत करण्यात आला.

वरील विशेष मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आलेली असून यापुढेही कारवाई सतत सुरु राहणार आहे. .

**२) गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०६.०४.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादी नामे श्रीमती पार्वतीबाई दयाल पाटी वय ८३ वर्षे रा. गल्ली क्र. ५, भिमनगर, बुध्दविहाराजवळ, रामेश्वरी, नागपुर ह्या मेडीकल हॉस्पिटल येथे उपचार करुन घरी जात असता, ऑटोरिक्शा चालकाने रामेश्वरीकडे जात आहे असे सांगितल्याने त्या ऑटोरिक्शामध्ये बसल्या. ऑटोरिक्शामध्ये आधीच दोन महिला बसलेल्या होत्या. ऑटोरिक्शा चालक दुसरीकडेच जात असल्याने फिर्यादी यांनी आरडाओरडा केल्याने ऑटोरिक्शा चालकाने त्याचा ऑटोरिक्शा पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, रेल्वे मेन्स् स्कुलजवळ थांबविला. फिर्यादी ऑटोरिक्शामधून उतरुन जात असता, ऑटोरिक्शातील एका महिलेले फिर्यादीचे गळयातील सोन्याची पोत २९ मणी असलेली, कि. १०,०००/— रु. जबरीने हिसकावून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०४(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी नामे १) कृष्णा कल्लू जाटव वय २४ वर्षे २) शिवानी कृष्णा जाटव वय २२ वर्षे दोन्ही रा. गल्ली क्र. २, जाटतरोडी क्र. ३, इमामवाडा, नागपुर ३) कॅटरिना युसूफ थामस वय २२ वर्ष रा. इंदीरामाता नगर, एनआयटी ग्राऊंडजवळ, यशोधरानगर, नागपूर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेली ई–रिक्शा क्रं. एमएच ४९ सीएफ ३१५४ कि. १,००,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव इमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे मसपोनि. मंगला हरडे व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

फिर्यादी लक्की सुनिल शाहू वय ३३ वर्ष रा. प्लॉट क्र. ७, झिंगाबाई टाकळी, शेवटचा बसस्टॉप मानकापूर यांचे मोठे भाऊ नामे राहूल सुनिल शाहू वय ३८ वर्ष हे दिनांक २०.०४.२०२६ चे १८.३० वा. त्यांचे ज्युपिटर मोपेड क्र. एमएच ३१ एफझेड ४१४३ ने घरुन निघाले होते. ते घरी परत न आल्याने पोलस पोलीस ठाणे सदर येथे दिनांक २१.०४.२६ रोजी हरविलेबाबत तक्रार नोंद करण्यात आली होती. दिनांक २२. ०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे जरीपटका हद्यीत नारा घाट येथील नाल्याचे पुलाखाली त्यांचा मृतदेह मिळाला होता. फिर्यादीचे भाऊ राहुल यांना कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरुन अज्ञात शस्त्राने डोक्यावर मारुन त्यांना जिवानिशी ठार केले व त्यांची ओळख लपविण्याकरीता त्यांचा मृतदेह लाल रंगाचे ब्लॅकेंटमध्ये गुंडाळून पांढरे रंगाचे बोरीमध्ये टाकून दोरीने बांधून घटनास्थळी आणुन फेकून दिले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३(१),२३६ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. जरीपटका पोलीसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत दखल घेऊन आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे नवीन पंजाबराव पुंडकर वय ४६ वर्ष रा.

कोहीनुर सोसायटी, नारा, नागपूर यास अटक केली आहे. आरोपीने पैशांचे वादावरुन नमुद गुन्हा केल्याचे समजले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे गिट्टीखदान</u>:–** इसम नामे मधुकर सखाराम नेवारे वय ७५ वर्ष रा. आयबीएम रोड, कृष्णानगर, सेमिनरी हिल्स्, नागपूर हे सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. दिनांक २२.०४.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिटटीखदान हद्दीत टिव्ही टॉवर येथील बसस्टॉपचे बाजुला असलेल्या आंब्यांचे झाडावर आंबे तोडण्याकरीता चढले होते. आंबे तोडतांना त्यांचा तोल जावुन, ते झाडावरुन खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान १४.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. गोपाल राऊत यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**